नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/06/2023 (सोमवार) सकाळ

## नागपूर ग्रामीण मध्ये जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांची अंमली पदार्थ विरोधी दिनाचे कार्यक्रमास उपस्थिती

आज रोजी अमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधुन नागपूर ग्रामीण जिल्ह्यांत विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने तुळशीराम पाटील इंजिनियरिंग कॉलेज बुटीबोरी येथे प्रमुख कार्यक्रम् घेउन् २५० विदयार्थ्यांना नशामुक्ती अभियांना बाबत मा. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर साहेब व जिल्हा पोलीस आधीक्षक श्री विशाल आनंद यांनीं मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात विदयार्थ्यांना अमली पदार्थाचे सेवन करणार नाही अशी शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला सहस नशामुक्ती केंद्राचे डॉ. योगेश किटे ह्यांनी तसेच sdpo पूजा गायकवाड मॅडम यांनीं सुद्धा मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला कॉलेजाचे अध्यक्ष मोहन पाटील गायकवाड हे सुद्धा प्रामुख्याने हजर होते. जिल्हयात प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीत संबंधित sdpo व ठाणेदार यांनीं जनजागृती करून शाळेत व कॉलेजला व्यसनमुक्ती अमली पदार्थाचे सेवानाचे दुष्परिणाम याबाबत कार्यक्रम घेण्यात आले तसेच रॅली काढण्यात आल्यात. असे एकूण २३ ठिकाणी कार्यक्रम घेण्याता आले. तसेच अमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्या साधुन विविध गुन्ह्यातील ४६ किलो गांजा ४६०००० रु. चा.भांडेवाडी येथील केंद्रात पोलीस आधीक्षक सा व अप्पर पोलीस आधीक्षक सा. यांचे उपस्थित नाश करण्यात आला.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर